**मे. एस.आर.जे. पित्ती स्टिल प्रा.लि., गट नं. ५९ ते ६३, गाव दरेगाव, अतिरीक्त एमआयडीसी फेज -II, जालना, ता. जालना, जिल्हा जालना या उदयोगाच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये एम.एस.बिलेटस/अलॉय बिलेटस-६,००,००० टी.पी.ए, टी.एम.टी. बारस/एम.एस. स्ट्रक्चरल स्टील/गटर/अँगल्स/चॅनल्स-६,००,००० टि.पी.ए., फेरो मँगनीझ-१२,८०० टी.पी.ए. व सिलिको मँगनीझ-९,५०० टि.पी.ए. पर्यंत उत्पादन निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

.....................................................................................................................................

मे. एस.आर.जे. पित्ती स्टिल प्रा.लि., गट नं. ५९ ते ६३, गाव दरेगाव, अतिरीक्त एमआयडीसी फेज -II, जालना, ता. जालना, जिल्हा जालना या उदयोगाच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये एम.एस.बिलेटस/अलॉय बिलेटस-६,००,००० टी.पी.ए, टी.एम.टी. बारस/एम.एस. स्ट्रक्चरल स्टील/गटर/अँगल्स/चॅनल्स -६,००,००० टि.पी.ए., फेरो मँगनीझ-१२,८०० टी.पी.ए. व सिलिको मँगनीझ-९,५०० टि.पी.ए.पर्यंत उत्पादन निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. ०६ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी १०.३० वाजता मे. एस.आर.जे. पित्ती स्टिल प्रा.लि., गट नं. ५९ ते ६३, गाव दरेगाव, अतिरीक्त एमआयडीसी फेज -II, जालना, ता. जालना, जिल्हा जालना प्रस्तावित स्थळी घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४० / २०२० पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २००८०३- एफटीएस-००३५ दि. ०३/०८/२०२० अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते. परंतू श्री. डॉ. प्र.म. जोशी समिती चे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद हे आजारामूळे रूग्णालयात दाखल असल्यामूळे सदर लोकसूनावणीस उपस्थित राहू शकले नाही.

१. मा. जिल्हाधिकारी, जालना : अध्यक्ष

२. उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना : समन्वयक

डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २७/०१/२०२० रोजी प्राप्त झाला होता. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना, पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांच्या परवानगीने दिं. ०३/०४/२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्याबाबत जाहीरात दिं. ०१/०३/२०२० रोजी मराठी दैनिक सकाळ व टाईम्स ऑफ इंडिया इंग्रजी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर प्रकल्पाविषयी पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये संबंधीत ग्रामपंचायत कार्यालये व इतर शासकीय कार्यालयांमध्ये इच्छूक व्यक्तींना अभ्यासण्याकरिता उपलब्द करून देण्यात आली होती. परंतू दिं.२४/०३/२०२० नंतर पूर्ण भारतामध्ये कोविड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी लॉकडाउन जाहीर केले असल्यामूळे मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सदरील लोकसूनावणी पूढे ढकलण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनूषंगाने दिं. २९/०३/२०२० दैनिक सकाळ मराठी व दिं. ०२/०४/२०२० रोजी टाईम्स ऑफ इंडिया इंग्रजी या वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटनाची जाहीरात देण्यात आली होती. मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी दिं. २८/०७/२०२० रोजी पून्हा सदर जाहीर लोकसूनावणी दिं. ०६/०८/२०२० रोजी घेण्याचे सांगितले त्याअनूषंगाने दिं.

३०/०७/२०२० व ३१/०७/२०२० रोजी जाहीरात दैनिक सकाळ मराठी व टाईम्स ऑफ इंडिया इंग्रजी या वृत्तपत्रामध्ये अनुक्रमे प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कार्यालय, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय जालना.
- ग्रामपंचायत कार्यालय, मौजे दरेगाव, ता. जि. जालना.
- उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ जालना.
- प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (मुख्यालय).
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

उप प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ जालना यांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. जिल्हाधिकारी, जालना व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

<u>प्रोसेडींग :</u>

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिचे नांव व पत्ता | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. गणेश तूकाराम ढवळे, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य दरेगाव यांनी सर्वपथम सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे हार्दिक स्वागत करतो तसेच या नविन प्रकल्पामूळे रोजगार निर्मिती होणार आहे त्यासाठी कंपनीचे प्रतिनीधी यांचे अभिनंदन, स्वागत व आभार व्यक्त करतो आणि पूढिल वाटचालीसाठी शूभेच्या देतो. यांनी पूढे सांगितले की, | उदयोगाच्या प्रकल्प सल्लागार श्री. राजेश परमार यांनी उत्तर दिले की, कंपनीचे एकूण सीएसआर खर्च १.२ कोटी आहे त्यापैकी १० टक्के हा गावासाठी खर्च करावा असे आपण सांगितले आहे. आणि आपली मागणी नोंदविण्यात आली आहे तर यामध्ये सदर कंपनीचा सीएसआर खर्चाच्या परवानगीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे प्रस्ताव देण्यात येतो त्यानंतर त्यांच्या अनूषंगाने आणि निर्देशानूसार सदर सीएसआर खर्च ठरवले जातात त्यावर योग्य तो निर्णय |

| | | |
|---|---|---|
| | सीएसआर च्या माध्यमातून २४ महिण्यात जो खर्च होणार आहे. विनंती करतो की, गावामध्ये त्यापैकी कंपनीच्या नियमाप्रमाणे १० टक्के खर्च करावा अशी ग्रामपंच्यायतीच्यावतीने आमची मागणी आहे तसेच हरित पटटयामध्ये जे काम होणार आहे त्यामध्ये आपण आमच्या गावामध्ये एकूण १००० झाडे सूरक्षाजाळीसहीत लावावीत अशी विनंती करतो. | नियमाप्रामाणे घेतला जाईल. |
| २. | श्री. सय्यद याकूब बाबामिया<br>रा. भाटेपूरी यांनी मुददा उपस्थित केला की, नविन प्रकल्पामधून स्थानिक लोकांना काम मिळेल का? स्थानिक लोकांना काम मिळावे अशी आमची विनंती आहे आणि कंपनीमूळे पर्यावरणावर जो धूर, धूळ व सांडपाणी वाढणार यामूळे कामगारांना काही हानी होवू नये यासाठी काय उपाययोजना करणार आहे ? | उदयोगाचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी उत्तर दिले की, नागरिकांना प्रत्यक्ष /अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळणार आहे तसेच न शिकलेला असला तरी काम शिकवल्या जाईल आणि येथेच रोजगार देण्यात येईल. दूसरी गोष्ट आपण प्रदूषणाबाबत विचारणा केली आहे तर प्रदूषण न होण्यासाठी नविन तंत्रज्ञानाच्या मशिनरी बसवण्यात येणार आहेत तसेच नियमानूसार चिमणीची उंची ही ४० मीटर इतकी असते त्यामध्ये ५ मीटर आणखी वाढवून ती ४५ मीटरची बसवण्यात येणार आहे व त्याखाली बॅग फिल्टर बसवण्यात येईल जेणेकरून निघणारा धूर शूध्द होवून बाहेर येईल त्यामूळे प्रदूषण होणार नाही. |
| ३. | श्री. सूरेश किशन हराळे<br>रा. इंदेवाडी, जालना यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पाच्या प्रदूषणामूळे आजूबाजूच्या गावावर काही परिणाम होईल का? | उदयोगाचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी उत्तर दिले की, आजूबाजूच्या गावाला कूठल्याही प्रकारचा विपरीत परिणाम होणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | श्री. किसनराव बाबूराव तिरूखे, सरपंच, दरेगाव यांनी असे सांगितले की, आपण नविन प्रकल्पामध्ये एकूण १४०० कामगार लावणार आहात तर त्यामध्ये दरेगाव गावातील जास्तीत जास्त कामगार घ्यावेत कारण प्रकल्पापासून गाव जवळ आहे. | उदयोगाचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी उत्तर दिले की, रोजगार निर्मिती होणारच आहे तर नक्की आपल्या गावातील लोकांना शिक्षाणाच्या आधारे रोजगार देण्यात येईल. |
| ५. | श्री. एम.बी. कोरके, ग्रामसेवक दरेगाव यांनी सर्वप्रथम प्रकल्पधारकांना नव्याने प्रकल्प यूनिट उभारण्यासाठी ग्रामपंचयातीच्या वतीने स्वागत केले तसेच श्री. पित्तीजी यांना पूढिल वाटचालीस शूभेच्या दिल्या व पूढे विनंती केली डेन्स फॉरेस्टच्या माध्यमातून झाडे लागवड करण्यात यावीत | उदयोगाचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी उत्तर दिले की, झाडांची लागवड नक्कीच करण्यात करण्यात यईल. |
| ६. | श्री. संदिप मूर्तिकर, रा. सोनल नगर, जालना यांनी मुददा उपस्थित केला की, स्थानिकांना नोकरी आणि स्थानिकांच्या नोकरी करणा-या कूंटूबांची आपण काय काळजी घेणार आहात? | उदयोगाचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी उत्तर दिले की, स्थानिक लोकांना रोजगार हा मिळणारच आहे आणि हे कंपनीच्या आणि गावाच्या दृष्टिने चांगलेच राहील. |
| ७. | श्री. निखील सातोनकर, रा. जालना यांनी मुददा उपस्थित केला की, यांनी विचारले की कंपनीचा जो प्रकल्प होत आहे आणि जालना हे शहर आहे या द्रष्टीकोनातून आमच जे शिक्षण झाल आहे आणि मी या कंपनीत नोकरी करू इच्छितो तर कंपनीच्या गरजेप्रमाणे जसे कामगार लागत असतील तर त्यांचा शिक्षणाशी संबंध असेल तर आम्ही कंपनीत नोकरी करू शकतो का किंवा आम्ही कुठे आमच्या शिक्षणात कमी पडलो तर आम्हाला नोकरी मिळेल का? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, या नवीन प्रकल्पामध्ये स्थानिक लोकांना, इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स, मेकॅनिकल इंजिनिअर्स ,मार्केटिंग एक्झीकेटिव असे रोजगार लागणारच आहेत. त्यांना आपण रोजगार देणारच आहोत आणि यामध्ये ज्यांचे शिक्षण कमी असेल त्यांना काम शिकवले जाईल. तसेच जे विध्यार्थी हूशार आहेत त्यांची कंपनीकडून प्रतिनियुक्ती सूध्दा करण्यात येईल. |

त्यानंतर जाहीर लोकसुनावणीचे समन्वयक डॉ. योगिनी बाळंखे यांनी उपस्थीत जनसमुहास आणखी कोणाचे काही प्रश्न किंवा काही समस्या असतील तर मांडू शकता असे सुचना केली. तथापि, कोणीही पुढे आले नाही.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जालना यांनी सर्वप्रथम परिसरातील सर्व नागरिक, कंपनीचे संचालक, कंपनीचे प्रवर्तक व म.प्रा.नि मंडळ चे सर्व अधिकारी यांचे स्वागत केले. मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सांगितले की, योगिनी बाळंखे, उप प्रादेशिक कार्यालय,जालना यांनी प्रकल्पाची व्यवस्थितरित्या पार्श्वभूमी सादरीकरण केले आहे. तसेच या प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण नागरिकांना समजेल अशा सोप्या व सरळ भाषेत झालेले आहे. त्यानंतर आपण नागरिकांना काही प्रश्न असतील, टिका, काही सूचना, काही आक्षेप असतील ते मांडण्यासाठी पूर्ण संधी उपलब्द करून दिलेली आहे. सदर लोकसूनावणी होईपर्यंत अद्याप एकही लेखी निवेदन, सूचना, आक्षेप, टिका या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. मा. जिल्हाधिकारी, जालना पूढे म्हणाले की, हा नविन प्रकल्प आहे याची एकूण ११.१४ हेक्टर जमिनीमध्ये उभारणी होणार आहे. खात्रीनीशी सांगता येईल की प्रकल्पाचे प्रतिनीधी यांनी सर्व शासकीय परवानग्या घेतलेल्या असतीलच. मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सर्व नागरिकांच्या प्रश्नावर थोडक्यात सांगितले की, सीएसआर च्या बाबतीत बहूतांश लोकांचे म्हणने आहे की, गावामध्ये खर्च करावा तर सीएसआर च्या धोरणानूसार त्यावर योग्य ते निर्णय घेण्यात येतील. मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी असे सूचित केले की, प्रकल्पाच्या वतीने लावण्यात येणारी झाडांची लागवड ही तीन वर्षात न करता ती पहिल्याच वर्षी लावण्यात यावीत आणि हवेची गूणवत्ता देखरेख करण्यासाठी तसेच हवेतील विविध कण जसे कार्बन मोनोक्साईड, सल्फर डायऑक्साईड किंवा इतर जे घातक वायू आहेत यांचे प्रत्यक्ष प्रमाण कळावे यासाठी प्रकल्पधारकाने ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टीम (Online Monitoring System) ची अमलबजावणी करावी जेणेकरून वास्तविक प्रमाण काय आहे हे कळण्यास मदत होईल. तसेच मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी कामगारांच्या आरोग्याबददल विचारणा केलेल्या प्रश्नावर असे सांगितले की, आजच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर औद्योगिक क्षेत्रामध्ये ज्या प्रामाणात कामगार मोठया संख्येने एकत्रित येतात अशा ठिकाणी नक्कीच कंपनीच्या प्रतिनिधीनी यावर योग्य त्या उपाययोजना कराव्यात जेणेकरून भविष्यात जर अशी काही

महामारी आली तर कारखाना बंद न ठेवता कशा पध्दतीने उत्पादन व काम सूरू ठेवता येईल याचाही कंपनीच्या प्रतिनिधीनी प्रकल्प उभारताना विचार करावा. मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सांगितले की, यानंतर अजून कोणाचे प्रश्न, मत, टिका, सूचना करावयचे असतील तर त्यांचे स्वागत आहे. तथापि, कोणीही पुढे आले नाही. तदनंतर मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सांगितले की, सदर जाहीर लोकसूनावणी ही पूर्ण झाली.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी जाहीर लोकसूनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सार्वजनिक सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**( डॉ. योगिनी बाळंखे)**
समन्वयक
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना

**( रविंद्र बिनवडे )**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हाधिकारी, जालना